GR-20040818155142001-0100

शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना अत्युत्कृष्ट कामाबद्दल आगाऊ वेतनवाढ मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय, क्रमांक-आवेवा-१०९[illegible]/प्र.क्र. [illegible]/आठ,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक [illegible]

वाचा:- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-एसआरव्ही-१०६९/डी, दिनांक २६ जून, ७०.
२) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-आवेवा-१०९०/प्र.क्र.१५२/आठ, दिनांक २९ ऑक्टोबर, ९०.
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक-सीएमआर-१२९३/९५३/प्र.क्र.२६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४.

शासन परिपत्रक

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक आवेवा-१०९०/प्र.क्र.१५२/आठ, दिनांक २९ ऑक्टोबर, १९९० शासन निर्णयानुसार आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करताना शासकीय कर्मचा-याचे/अधिका-याचे पाच वर्षांचे गोपनीय अहवाल विचारात घेतले जातात. तथापि शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक-सीएमआर-१२९३/९५३/प्र.क्र.९६/९३/१३, दिनांक २६ जुलै, १९९४ नुसार गट "ड" मधील कर्मचा-यांचे गोपनीय अभिलेख लिहिण्याची पध्दत बंद करण्यात आली आहे. परंतु गट "ड" मधील प्रत्येक कर्मचा-यासाठी जी वैयक्तिक नस्ती ठेवण्यात येते त्यात कर्मचा-यांचा वाईट/उत्कृष्ट अशा दोन्ही प्रकारच्या कामासंबंधी वर्षनिहाय नोंद घेण्यात यावी असेही आदेश आहेत. परंतु गट "ड" मधील कर्मचा-यांचे गोपनीय अहवाल लिहिण्याची पध्दत बंद केल्याने या गटातील कर्मचा-यांना आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करतांना कुठली कार्यपध्दती अवलंबिण्यात यावी असा प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. याबाबत पुढील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१] गट "ड" मधील ज्या शासकीय कर्मचा-याला आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे, त्या शासकीय कर्मचा-याचे ९३-९४ या वर्षापर्यंतचे गोपनीय अहवाल उपलब्ध असल्याने आगाऊ वेतनवाढ/वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव तपासताना ९३-९४ पर्यंतचे गोपनीय अहवाल विचारात घ्यावेत व त्यापुढील वर्षाकरीता वैयक्तिक नस्तीतील शेरे अवलोकीत करावेत.

२] गट "ड" मधील कर्मचा-यास दोन आगाऊ वेतनवाढी ज्या वर्षात देण्याचा प्रस्ताव आहे त्या वर्षाच्या अलीकडील पाचही वर्षांचे संबंधित कर्मचा-याच्या वैयक्तिक

नस्ती मधील अहवालामध्ये अतिउत्कृष्ट [अ +] नोंदी असणे आवश्यक आहे अथवा पाच पैकी किमान चार वर्षाच्या अहवालामध्ये अतिउत्कृष्ट आणि उत्कृष्ठ उर्वरित एका वर्षाच्या अहवालामध्ये निश्चित चांगला स्वरूपाच्या नोंदी असणे आवश्यक आहे.

3] गट 'क' मधील शासकीय कर्मचाऱ्यास एक आगाऊ वेतनवाढ प्रस्तावित करताना त्याच्या वैयक्तिक नस्तीमधील त्या वर्षाच्या अलिकडील पाच वर्षाच्या अहवालापैकी किमान तीन वर्षांचे अहवालामध्ये अतिउत्कृष्ट [अ +] आणि दोन वर्षांच्या अहवालामध्ये निश्चित चांगला [ब +] स्वरूपाच्या नोंदी असणे आवश्यक आहे.

४] ९३-९४ या वर्षापर्यंतचे गोपनीय अहवाल उपलब्ध असल्यास या अहवालांची प्रतवारी उपरोक्त [२] व [३] मध्ये नमूद केल्याप्रमाणे आहे याची खात्री करून घ्यावी. व ९३-९४ च्या पुढील वर्षाकरीता वैयक्तिक नस्तीतील नोंदीचा आधार घ्यावा. प्रतवारी निश्चित करताना गोपनीय अहवालातील प्रतवारी व वैयक्तिक नस्तीतील नोंदीची प्रतवारी अशी फारकत करण्यात येणार नाही. या दोन्ही प्रतवारी एकत्रितपणे विचारात घेण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

[प.मा. जोशी]
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

राज्यपालांचे सचिव, राजभवन, मलबारहिल, मुंबई-४०० ०३५,
मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व मंत्री यांचे खाजगी सचिव,
सर्व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
* प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई [१० जादा प्रतींसह],
* सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधानपरिषद सचिवालय, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, [लेखा व हकदारी], मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१ [लेखा परीक्षा], मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२ [लेखा व हकदारी], नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, [लेखा व परीक्षा], नागपूर,

...३/-